# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

**दिनांक ३१.०८.२०२६ सोमवार**

**मा. पोलीस आयुक्त यांचे प्रमुख उपस्थितीत डब्ल्युसीएल येथील सुरक्षा प्रशिक्षण केंद्रातील दीक्षांत समारंभ संपन्नः**

दिनांक ३१.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. वेस्टर्न कोल फिल्डस् लिमीटेड च्या इंदोरा, नागपूर येथील सुरक्षा प्रशिक्षण केंद्र येथे आयोजीत करण्यात आलेला दीक्षांत समारंभाला मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर हे प्रमुख अतिथी होते. याप्रसंगी पासींग आऊट परेडचे निरीक्षण करुन मा. पोलीस आयुक्त यांनी मानवंदना स्विकारली. समारंभामध्ये डब्ल्युसीएलचे सर्व अनुषांगीक कंपन्यांमधुन आलेल्या अधिकाऱ्यांनी तसेच विभागीय सुरक्षा कर्मचारी यांनी प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर त्यांच्या उत्कृष्ट शिस्तीचे, समपर्णाचे आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रदर्शन केले. मा. पोलीस आयुक्त यांनी प्रशिक्षणार्थी यांनी प्रदर्शित केलेल्या उच्च दर्जाच्या शिस्तीचे व व्यावसायीक कौशल्याचे कौतुक केले. तसेच त्यांनी औद्योगिक सुरक्षा ही देशाच्या आर्थिक आणि उर्जा सुरक्षेचा एक महत्वाचा आधारस्तंभ असल्याचे सांगुन प्रशिक्षणार्थी यांनी त्यांच्या जबाबदाऱ्या योग्य रितीने पार पाडाव्यात असे सांगून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थी कर्मचारी यांना मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते पुरस्कार व प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

समारंभानंतर मा. पोलीस आयुक्त यांनी सुरक्षा प्रशिक्षण केंद्र, इंदोरा येथे स्थापित स्मार्ट व आधुनिक शस्त्र प्रशिक्षण/फायरींग सिम्युलेशन सुविधेचे अवलोकन केले.









(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ३०.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १५ केसेसमध्ये १५ ईसमावर कारवाई करून एकुण ११,०४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसेसमध्ये ०९ इसमांवर कारवाई करून एकुण ६३,५५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३२८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,४१,८५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ३०.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ३१.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०४ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे लकडगंज :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ३०.०८.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, गंगा—जमुना परिसर, बजरंग सायकल स्टोअर्स जवळ एक संशयीत इसम पोलीसांना पाहून पळू लागल्याने त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव हिमांशु नामदेव चिंचोळकर वय २५ वर्षे रा. प्लॉट क्र. १५५, तलमले ले आऊट, ओमनगर, पारडी नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. २४/२०२६, दिनांक १६.०६.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे अंबाझरी :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ३०.०८.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, फुटाळा रॅम्प, गाडी पार्कींग अंबाझरी येथे एक इसम शस्त्र घेवून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव पियुष उर्फ पेडा विनोद बघेल वय २० वर्षे रा. गल्ली क्र. ३, मोहन नगर, गड्डीगोदाम, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आत एक धारदार लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०८.२०२६ चे ११.१५ चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्यीत पांजरी ओव्हरब्रिजवर जबलपुर कडून टोलनाक्याकडे जाणारे रोडवर एक अनोळखी अंदाजे ४० ते ४५ वर्ष वयाचा इसम, रंग—सावळा, चेहरा—लांब, बांधा—मध्यम, उंची—अंदाजे ५ फुट ५ इंच, अंगात— फक्त अंडरविअर घातलेला अशा वर्णनाचा, कोणत्यातरी वाहनाने अपघात होऊन हात कटलेल्या अवस्थेत मृत स्थितीत मिळून आला. नमुद इसम हा वेडसर असून परिसरात फिरत असल्याचे फिर्यादी यांनी सांगितले. मृतदेह पुढील कार्यवाहीस्तव मेडीकल हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे.

याप्रकरणी हायवे पेट्रोलींग ऑफीसर पांजरी टोल नाका, फिर्यादी श्रीकांतसिंग प्रकाशसिंग गिल वय ३९ वर्षे रा. प्लॉट क्र. ७, बर्डे ले आऊट, घोगली, बेसा, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. ऋषिकेश कडुस ९३२५३३५४५८ यांनी अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**४) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २६.०८.२०२६ चे १४.०० वा. ते दिनांक २९.०८.२०२६ चे १७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्यीत प्लॉट क्र. २६३, पांडे हार्डवेअर जवळ, फ्रेन्डस् कॉलनी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी किरणबाला विजयसिंग ठाकूर वय ५६ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह दिल्ली येथे नातेवाईकांकडे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मागील खिडकीचे ग्रिल कापुन, तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २,३२,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिन, विदेशी घडयाळ व डिव्हीआर असा एकुण किंमती ४,११,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. रामेश्वर जाधव ७३८७३२२९५१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**